# 1 फेब्रुवारी

**आजचा सुविचार :**

"विश्वास हा खोडरबर सारखा असतो. तुम्ही केलेल्या प्रत्येक चुकीबरोबर तो कमी होत जातो."

**आजचे पंचांग :**

वार – मंगळवार मास - पौष नक्षत्र – श्रवण

सूर्योदय – सकाळी 7.02 वाजता सूर्यास्त – सायंकाळी 6.29 वाजता

**आजचे दिनविशेष :**

1. भारतीय तटरक्षक दल दिवस.

2. 1884 : ला आजच्या दिवशीच ऑक्सफर्डच्या डिक्शनरी ची पहिली आवृत्ती प्रकशित करण्यात आली होती.

3. 1977 : ला 'इंडियन कोस्ट गार्ड' ची स्थापना करण्यात आली.

4. 1992 : ला आजच्या दिवशी केंद्रशासित प्रदेश दिल्लीला राष्ट्रीय राजधानी म्हणून दर्जा मिळाला.

**आजचे इंग्लिश शब्द :**

1) Essay – निबंध 2) Every - प्रत्येक 3) Everyday – रोज 4) Extra – अतिरिक्त

**आजची प्रश्नमंजुषा :**

1) एका वर्षामध्ये किती महिने असतात? 2) उर्जेचा मुख्य स्त्रोत कोणता?

3) 3 च्या पटीतील 4 संख्या सांगा. 4) मानवी शरीरात किती फुफ्फुसे असतात?

**बोधकथा :**

## आत्मपरीक्षण

"एक तरुण मुलगा पब्लिक फोन ठेवलेल्या दुकानात येतो.

तरुण (अदबीने) : दुकानदार काका, मी एक फोन करू का ?

तरुणाचे आदबशीर वागणे पाहून दुकानदार खुश होतो. तो तरुण फोन नंबर फिरवून रिसिव्हर कानाला लावतो. (डायलवाला जुन्या काळाचा फोन असल्याने पलीकडून बोलणाऱ्या व्यक्तीचा आवाज इकडे इतरांना देखील अस्पष्ट ऐकू यायचा !! तसे ते बोलणे दुकानदार हळूच ऐकू लागला)

तरुण : बाईसाहेब, तुमच्या बागेच्या सफाईचे काम मला द्याल का ? मी माळीकाम खूप छान करतो.

महिला : (तिकडून बोलतेय) नको. मी एक महिन्यापूर्वीच एकाला ठेवले आहे.

तरुण : बाई, प्लिज, मला फार गरज आहे हो, आणि तुम्ही त्याला जितका पगार देता त्याच्या निम्म्या पगारात काम करायला मी तयार आहे !!

महिला : पण माझ्याकडे जो आहे, त्याच्या कामावर मी समाधानी आहे. मग त्याला का काढून टाकू ?

तरुण : बाई, बाग कामासोबतच मी तुमच्या घरातले सफाईचे काम फ्री करेन. प्लिज मला कामावर घ्या न !!

महिला : तरीही नको बाबा !! दुसरीकडे काम पहा !! माझ्याकडे नाही !!

यावर हसत हसत फोन ठेवून निघाला. दुकानदाराने त्याला थांबवले. आणि विचारले की, "तू प्रयत्न केलास पण नोकरी मिळाली नाही न ? मला तुझा स्वभाव आवडला. कष्ट करण्याची तयारी आवडली. वाटल्यास तू माझ्या दुकानात नोकरी करू शकतोस"

यावर पुन्हा हसून तो तरुण म्हणाला, "मला नोकरी नकोय. नक्की नकोय."

दुकानदार : मग आत्ता तर त्या फोनवर इतक्या विनवण्या करत होतास न ?

तरुण : मी खरेतर त्या बाईंना काम मागत नव्हतो तर स्वत:चे काम तपासत होतो. मीच त्या बाईंच्या बागेचे काम करतो. मी करत असलेले काम माझ्या मालकाला आवडतेय की नाही ? हे चेक करत होतो"

असे म्हणून तो तरुण निघतो, दुकानदार त्याच्या पाठमोऱ्या आकृतीकडे चकित होऊन पाहत राहतो.

“ तात्पर्य ” ::~

अधूनमधन आपण स्वत:च स्वत:चे आत्मपरीक्षण करणे गरजेचे आहे. "जो स्वत:ला तटस्थपणे पाहून परीक्षण करू शकतो, तो नक्कीच इतरांपेक्षा पुढे जातो. "